



# पारनेर दर्शन







वर्ष १ अंक २२३, मंगळवार २१ मे २०२४ ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे RNI No.MAHMAR/2015/61493 किंमत : ३ रुपये


# मांडओहळ प्रकल्पात नगरच्या दोन युवकांना जलसमाधी

## रविवारी दुपारची दुर्घटना

म्हसोबा झाप : प्रतिनिधी

**पारनेर तालुक्यातील मांडओहळ प्रकल्पाच्या मृत साठयामध्ये पोहण्यासाठी उतरलेल्या नगर शहरातील दोन युवकांचा पोहता येत नसल्याने बुडून दुर्दैवी मृत्यू झाला. अथर्व श्रीनिवास श्रीराम वय १८ रा. शिवाजीनगर, नगर-कल्याण रस्ता, नगर व सौरभ नरेश मच्छा वय १८ रा. नगर ही प्रकल्पात बुडालेल्या युवकांची नावे आहेत.**

नगर शहरातील नगर-कल्याण रस्ता परीसरातील सहा युवक रविवारी सकाळी पारनेर तालुक्यातील विविध ठिकाणांना भेट देण्यासाठी दुचाकीवरून आले होते. निघोज येथील रांजणगखळे परिसरास भेट दिल्यानंतर दुपारी चारच्या दरम्यान मयत अथर्व श्रीराम व सौरभ मच्छा यांच्यासह चैतन्य बालाजी सापा वय १९ रा. शिवाजीनगर, नगर, आकाश अनिल हुंदाडे वय १८, जीवन दिनेश पाटील रा. रेल्वेस्टेशन, आगरकर मळा नगर, अभिलाश रघुनाथ सुरम रा. नगर हे सहा जण नगर-कल्याण महामार्गानजीकच्या मांडओहळ प्रकल्प परीसरात पोहचले. या प्रकल्पात पाण्याचा सध्या मृत साठा असून कमी असलेले पाणी पाहून अथर्व श्रीराम व सौरभ मच्छा हे दोघे पोहण्यासाठी पाण्यात उतरले. पोहताना दोघांनाही पाण्याचा अंदाज न आल्याने इतर मित्रांनी आरडा ओरडा सुरू केला. काही युवकांनी आपल्या घरी झालेल्या घटनेची माहीती दिल्यानंतर काही वेळात त्यांना मदत उपलब्ध झाली.

या दुर्घटनेची माहीती समजल्यानंतर प्रकल्पाजवळील म्हसोबा झापचे सरपंच इतर सहकाऱ्यांसह घटनास्थळी पोहचले. त्यांनी दोघा युवकांचा शोध घेण्याचा प्रयत्न सुरू केला. त्यावेळी अथर्व श्रीराम यास पाण्याबाहेर काढण्यात त्यांना यश आले. मात्र त्याचा मृत्यू झाला होता. सौरभ मच्छा याचा मात्र शोध लागत नव्हता. सायंकाळी उशिरापर्यंत शोध कार्य केल्यानंतर अंधारामुळे शोध कार्य थांबविण्यात आले. सोमवारी सकाळी पुन्हा शोधकार्य सुरू करण्यात आल्यानंतर सकाळी नऊ वाजण्याच्या सुमारास सौरभ मच्छा याचा मृतदेह पाण्यावर तरंगताना आढळून आला. या घटनेची माहीती मिळाल्यानंतर पारनेर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक समीर बारवकर यांनी घटनास्थळी भेट देऊन शोधकार्यास मदत केली. सौरभ मच्छा याचा शोध घेण्यासाठी नगर येथून स्वतंत्र पथकही पाचारण करण्यात आले होते.

या मदत कार्यात म्हसोबा झापचे सरपंच प्रकाश गाजरे यांच्यासह अजय वाघ, विक्रम वाघ, रवींद्र वाघ, अविनाश वाघ, जिगर माळी, अर्जुन वाघ, दीपक वाघ, दादाभाऊ वाघ, अमोल वाघ या तरूणांनी प्रशासनास मोलाची मदत केली.



■ मांडओहळ प्रकल्पात पोहण्यासाठी उतरलेल्या नगर येथील दोन युवकांनी मृतदेह स्थानिकांच्या मदतीने पाण्याबाहेर काढण्यात आले.

### नीलेश लंके यांच्या कार्यालयाची तत्परता

**या दुर्घटनेची माहीती मा. आ. नीलेश लंके यांच्या संपर्क कार्यालयास समजल्यानंतर लंके यांचे नगर येथील स्वीय सहाय्यक शिवाजी कराळे यांनी त्याबाबत पारनेर येथील स्वीय सहाय्यक संदीप चौधरी यांना माहीती देत मदत करण्याबाबत कळविले. संदीप चौधरी यांनी सुरूवातीस म्हसोबा झापचे सरपंच प्रकाश गाजरे यांच्याशी संपर्क करून मदतीसाठी घटनास्थळी जाण्याच्या सुचना दिल्या. त्यानुसार गाजरे यांनी तरूणांसह घटनास्थळी धाव घेत मदत कार्य सुरू केले. त्यानंतर चौधरी यांनी पोलीस निरीक्षक समीर बारवकर, तहसिलदार गायत्री सैंदाणे यांनाही या दुर्घटनेची माहीती देत तत्परता दर्शविली.**

### धोक्याचा इशारा देणारे फलक लावावेत

**गेल्या काही वर्षांत मांडओहोळ प्रकल्पासह रुईचोंढा धबधब्याच्या डोहात बुडून अनेक तरूणांना जीव गमवावे लागले आहेत.ही दोन्ही ठिकाणे पोहण्यासाठी धोक्याची आहेत.पाटबंधारे विभागाने या परिसरात धोक्याचा इशारा देणारे फलक लावणे आवश्यक आहे. पर्यटकांनी या परिसरात फिरताना सावधगिरी बाळगावी.मांडओहोळ प्रकल्पात,रुईचोंढा धबधब्याच्या डोहात पोहण्याचा मोह टाळावा.**

**प्रकाश गाजरे,**
**सरपंच म्हसोबा झाप.**

# चोरट्यांचा धुमाकुळ!

## ■ चिंचोलीत दिवसाढवळया घर फोडले ■ पारनेरच्या वरखेडमाता मंदिरातून दानपेटी, घंट्यांची चोरी

पारनेर / चिंचोली : प्रतिनिधी

**तालुक्यातील चिंचोली येथील शेतकऱ्याचे घर सोमवारी दिवसाढवळया फोडून रोख रक्कम तसेच सोन्याचे दागिण्यांची चोरी करण्यात आली तर पारनेर शहरातील वरखेडमाता देवीच्या मंदिराच्या दाराचे कुलूप तोडून दानपेटीतील रक्कम, घंटया, समाई, ताटांची चोरी करण्यात आली.**

चिंचोली येथील अहिलू विश्वनाथ पिंपरकर हे सोमवारी सकाळी त्यांच्या पत्नीसह शेतामध्ये खत पसरविण्यासाठी गेले होते. दुपारी साडे बारा वाजण्याच्या सुमारास पिंपरकर व त्यांच्या पत्नी शेतातून घराकडे परतले असता त्यांना घर उघडे दिसले. त्यांनी पाहणी केली असता दाराचा कोयंडा उचकटून घर फोडल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. घरातील समानाची करण्यात येऊन रोख दिड लाख तसेच दोन तोळे सोन्याचे दागिणे घेऊन चोरटे पसार झाले. या घटनेसंदर्भात पारनेर पोलीसांना माहीती देण्यात आल्यानंतर पोलीसांनी घटनास्थळी धाव घेतली.

पारनेर शहरातील वरखेड मळयातील वरखेड माता देवीच्या मंदिरातील दानपेटी फोडून चोरटयांनी त्यातील पैसे, मंदिरातील घंटा, समई तसेच ताटे चोरून नेले. मंदिराच्या दरवाजाचे कुलूप तोडून चोरटयांनी मंदीरात प्रवेश केला. सोमवारी सकाळी आठ वाजता मंदिराचे पुजारी पोपट धोंडीभाऊ पठारे हे मंदिराकडे गेले असता त्यांना मंदिराचे कुलूप तोडण्यात आल्याचे निदर्शनास आले. मंदिरात प्रवेश करून पाहणी केली असता दानपेटीचे कुलूप तोडून त्यातील पैसे तसेच घंटा, समई तसेच ताटांचीही चोरी झाल्याचे त्यांच्या लक्षात आले.

पठारे यांनी डॉ. सचिन औटी व भाऊसाहेब पठारे यांना या घटनेची माहीती दिल्यानंतर औटी व पठारे यांनी मंदिरात जाऊन पाहणी केली. या चोरीसंदर्भात पारनेर पोलीसांना माहीती देण्यात आली असून उशिरापर्यंत पोलीस घटनास्थळी पोहचले नव्हते.



# कुकडी आवर्तनासंदर्भात आ. लंके यांनी वेधले लक्ष

## २५ मे रोजी आवर्तन सोडण्याची मागणी

पारनेर : प्रतिनिधी

**कुकडी डावा कालव्याचे येत्या २५ मे पासून आवर्तन सोडण्याची मागणी मा. आ. नीलेश लंके यांनी कुकडी प्रकल्प कालवा सल्लागार समितीचे सदस्य सचिव तथा अधिक्षक अभियंता यांच्याकडे केली आहे.**

यासंदर्भात अधिक्षक अभियंत्यांना देण्यात आलेल्या निवेदनात नमुद करण्यात आले आहे की, कालवा सल्लागार समिती कुकडी व घोड प्रकल्पाच्या अध्यक्षांच्या अध्यक्षतेखाली दि.२० ऑक्टोबर २०२३ रोजी पार पडलेल्या बैठकीत ठरल्याप्रमाणे कुकडी प्रकल्पांतर्गत कुकडी डाव्या कालव्याचे उन्हाळी हंगामाचे सन २०२४ चे आवर्तन सध्यस्थितीमध्ये हवामानाचा व पावसाचा अंदाज घेऊन, शेतकऱ्यांच्या गरजेनुसार सोडण्याबाबत चर्चा झाली होती. तसे निर्देशही अध्यक्षांनी दिले होते.

मतदारसंघाचा आढावा घेतल्यानंतर पाण्याची तीव्र टंचाई निर्माण झाली असून नागरीकांना पिण्यासाठी तसेच जनावरांच्या चारा पिकांसाठी पाण्याची आवश्यकता आहे. त्यासाठी दि. २५ मे पासून आवर्तन सुरू करण्याची शेतकरी वर्गाकडून मागणी करण्यात येत आहे. या मागणीचा विचार करून येत्या २५ मे पासून आवर्तन सुरू करण्याची मागणी लंके यांनी अधिक्षक अभियंता यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे.



# नाशकात निवडणूकीत गाजला कांद्याचा प्रश्न

## कांद्याच्या माळा घालत मतदान केंद्रावर हजेरी

नाशिक : प्रतिनिधी

**नाशकात कांद्याचा प्रश्न संपूर्ण निवडणुकीत गाजला. नरेंद्र मोदी हे महायुतीच्या उमेदवारांच्या प्रचारासाठी आले होते, तेव्हाही त्यांच्या सभेत कांद्याचा प्रश्न उपस्थित करण्यात आला. आता मतदानाच्या दिवशीही हा प्रश्न पुन्हा एकदा समोर आला आहे. नाशकातील शेतकऱ्यांनी चक्क गळ्यात कांद्याच्या माळा घालत मतदान केंद्रावर हजेरी लावली. हे पाहून सारेच आश्चर्यचकित झाले.**

नाशकातील चांदवड तालुक्यातील वडगाव पंगू येथे शेतकऱ्यांनी गळ्यात कांद्याच्या माळा घालून मतदान केंद्रावर हजेरी लावली. गळ्यात कांद्याची माळ घातलेल्या मतदारांना पाहून साऱ्यांनाच आश्चर्य वाटले. मात्र, पोलिसांनी या शेतकऱ्यांना जागीच अडवले आणि माळा काढून मतदान करण्याचं आवाहन केलं. यामुळे मतदानकेंद्र परिसरात जमाव जमला होता. काहीकाळ तिथे तणावाचं वातावरण निर्माण झालं होतं.



दिंडोरीत मतदान केंद्राबाहेर अनोखे आंदोलन दिंडोरी लोकसभा मतदारसंघात कांद्यावरून अनोखे आंदोलन पाहायला मिळाले. नैताळे येथे लासलगाव कृषी उत्पन्न बाजार समीतीचे संचालक राजेंद्र बोरगुडे व नैताळे सोसायटीचे माजी अध्यक्ष बापूसाहेब बोरगुडे मंतदान केंद्राबाहेर कांद्याच्या माळा आणि टोमॅटोची माळ गळ्यात घालुन उभे होते. त्यानंतर मतदान केंद्राबाहेर उभे असलेल्या आंदोलकांना पोलिसांनी अटक केली आहे.

लोकसभेसाठी शिंदे गट विरुद्ध उद्धव ठाकरे गट लोकसभा निवडणुकीच्या पाचव्या टप्प्यातील १३ जागांसाठी आज राज्यात मतदान होत आहे. सकाळी सात वाजल्यापासून मतदानाला उर्वरीत पान ३ वर

# महागड्या मोबाईलच्या हट्टापायी संपविले जीवन

## युवकाची २३ दिवसांची झुंज अखेर अयशस्वी

जामखेड : प्रतिनिधी

**मित्रांकडे महागडे मोबाईल आहेत, तसा आपल्यालाही हवा, असे म्हणत त्याने शिक्षक असलेल्या वडिलांकडे मुलाने हट्ट केला. मात्र वडिलांनी नकार दिला. त्यामुळे त्याने विषारी औषध सेवन केले. त्याला तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. २३ दिवस मृत्यूशी झुंज दिल्यानंतर अखेर त्याचा मृत्यू झाला आहे. जामखेडमधील गजानन रामदास उगले (वय २३, रा. नायगाव) याने महागड्या मोबाईलसाठी आपले अमूल्य जीवन संपविले आहे.**

रामदास उगले रयत शिक्षण संस्थेच्या खर्डा येथील विद्यालयात शिक्षक आहेत. त्यांचा मुलगा गजानन याने त्यांच्याकडे महागड्या मोबाईलसाठी हट्ट उर्वरीत पान ३ वर



# प्रतीक्षा संपली : बारावीचा निकाल मंगळवारी!

## राज्यातून तब्बल पंधरा लाख परीक्षार्थी



पुणे : प्रतिनिधी

**राज्य मंडळाच्या नऊ विभागीय मंडळांमार्फत २१ फेब्रुवारी ते २३ मार्च या कालावधीत घेण्यात आलेल्या बारावीच्या परीक्षेच्या निकालाची विद्यार्थ्यांची प्रतीक्षा आता संपली आहे. राज्य मंडळाने जाहीर केल्यानुसार उद्या म्हणजेच २१ मेला बारावीचा निकाल जाहीर होणार आहे. यंदा राज्यातून परीक्षेसाठी तब्बल १५ लाखांहून अधिक विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. गेल्या वर्षी राज्य मंडळाने बारावीच्या परीक्षेचा निकाल २५ मे रोजी, तर दहावीच्या परीक्षेचा निकाल २ जून रोजी जाहीर केला होता.**

यंदा गेल्यावर्षीपेक्षाही लवकर निकाल जाहीर करण्याची तयारी असल्याची माहिती राज्य मंडळाकडून देण्यात आली होतीच. याच पार्श्वभूमीवर आज सकाळपासून ऑनलाईन अशीही चर्चा रंगली होती की आज महाराष्ट्रात लोकसभा निवडणुकीच्या मतदानाचा पाचवा व शेवटचा टप्पा पार पडताच निकाल जाहीर केला जाईल. आता महाराष्ट्र राज्य शिक्षण मंडळाच्या वतीने या चर्चांची पुष्टी करण्यात आली आहे.

### कसा बघता येईल निकाल?

महाराष्ट्र बोर्डाचा १२वीचा निकाल २०२४ पाहण्यासाठी, तुम्हाला प्रथम अधिकृत वेबसाइट mahresult.nic.in ला भेट द्या.
वेबसाइटच्या मुख्यपृष्ठावर, तुम्हाला निकाल बघण्यासाठीची लिंक दिसेल त्यावर क्लिक करा.
त्यानंतर तुम्हाला रोल नंबर आणि आईचे नाव टाका.
निकाल पहा असं लिहलेल्या बटणावर क्लिक करा.
यानंतर, तुमचा निकाल स्क्रीनवर दिसेल. या मार्कशीटची प्रत तुम्ही तिथून डाउनलोड करू शकाल.
महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च उर्वरीत पान ३ वर









निरोगी आरोग्याचा कानमंत्र...

# निरामय



# उन्हाळयात बाहेर जाण्यापूर्वी...

**प्रत्येकाला कडक ऊन आणि उष्णता टाळायची असते. म्हणून या दिवसांत कामाशिवाय घरी राहून हे टाळता येते, पण काही कामानिमित्त बाहेर जावे लागले तर कडक उन्हाचा आपल्याला सामना करावा लागतो. काही लोकं तीव्र सूर्यप्रकाशामुळे सनबर्नची तक्रार करतात, तर काही लोकांना लाल पुरळ येऊ लागतात. तसेच जर बाहेर जाणे खूप महत्वाचे असेल तर घरातून बाहेर पडताना काही आवश्यक वस्तू सोबत ठेवाव्यात. घरातून बाहेर पडताना कोणकोणत्या वस्तू सोबत ठेवाव्यात ते जाणून घ्या...**

उन्हाळ्यात घराबाहेर पडताना सहसा छत्री, हातमोजे आणि स्कार्फ वापरणे आवश्यक आहे, जेणेकरून कडक उन्हापासून चेहऱ्याचे संरक्षण करता येईल. यासोबतच घरातून बाहेर पडण्यापूर्वी चेहऱ्यावर चांगल्या दर्जाचे सनस्क्रीन क्रीम लावा, ज्यामुळे सूर्याच्या किरणांपासून संरक्षण होऊ शकते.

- भरपूर पाणी प्या : नितळ त्वचा मिळविण्याचा सर्वोत्तम मार्ग म्हणजे पाणी पिणे कारण पाण्यामुळे शरीरात आणि त्वचेचे हायड्रेशन वाढते. दिवसातून कमीत कमी ६ ते ७ लीटर पाणी पिणे आवश्यक आहे. तसेच त्वचा घट्ट आणि चमकदार होण्यास मदत होते. त्यामुळे त्वचेच्या पेशी चांगल्या प्रकारे काम करतात आणि टॉक्सिन्स बाहेर पडतात.
- हंगामी फळांचे सेवन करा : उन्हाळ्यात शरीराला अधिकाधिक पाण्याची गरज असते. अशा परिस्थितीत काकडी, टरबूज इत्यादींचे सेवन तुमच्यासाठी फायदेशीर ठरू शकते. खरं तर, काकडीत व्हिटॅमिन सी, व्हिटॅमिन के, कॉपर, मॅग्नेशियम, पोटॅशियम, मॅंगनीज आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे सिलिका यांसारखे आवश्यक पोषक घटक असतात. त्वचा आणि केसांसाठी हे खूप फायदेशीर मानले जाते.
- झोपण्यापूर्वी करा हे काम : यासोबतच दररोज उन्हातून आल्यानंतर संध्याकाळी झोपण्यापूर्वी त्वचेची चमक कायम ठेवण्यासाठी बेसन, हळद पावडरमध्ये दूध किंवा मलई मिसळून पेस्ट तयार करा. आता ही पेस्ट तुमच्या चेहऱ्यावर आणि मानेवर लावा आणि हलक्या हातांनी मसाज करा. १० मिनिटे चेहऱ्यावर राहू द्या, नंतर पाण्याने चेहरा धुवा. यामुळे तुमच्या चेहऱ्यावर चमक येईल आणि उन्हाळ्यात त्वचा चमकदार होईल.

# उन्हाळयात घरीच बनवा फेस सीरम!



उन्हाळ्याचा हंगाम सुरू आहे. या ऋतूत उन्हामुळे आणि मातीमुळे त्वचेचे खूप नुकसान होते. त्वचेवर मुरुम, पिंपल्स वगैरे होऊ लागतात. इतकंच नाही तर यामुळे त्वचाही निस्तेज दिसते, उन्हाळ्याच्या ऋतूत चेहऱ्याची विशेष काळजी घेणं गरजेचं असतं. चांगली आणि सुंदर त्वचा मिळवण्यासाठी टोनिंग, मॉइस्चरायझिंग करणे अत्यंत महत्वाचे आहे.

चेहऱ्यावर सीरम लावल्याने त्वचेशी संबंधित अनेक समस्या दूर होण्यास मदत मिळते. फेस सीरम आपल्या त्वचेला पोषण देणाऱ्या घटकांचा वापर करून तयार केले जाते. या घटकांमध्ये पोषक असतात जे आपली त्वचा निरोगी आणि सुंदर ठेवतात. बाजारात उपलब्ध असलेले अनेक फेस सीरम हानिकारक रसायनांनी तयार केले जातात. अशा परिस्थितीत, तुम्ही हे सिरम बाहेरून विकत घेण्यापेक्षा घरीच बनवू शकता. होममेड सीरम तुमच्या त्वचेला केवळ नैसर्गिक पोषणच देत नाही तर कोणत्याही ॲलर्जीशिवाय तुमची त्वचा चमकदार आणि निरोगी बनवेल.

## असे सीरम बनवा

घरी सीरम बनवण्यासाठी एका भांड्यात एक चमचा एलोवेरा जेल, अर्धा चमचा व्हिटॅमिन ई तेल आणि दोन थेंब लॅव्हेंडर तेल मिसळा आणि एका स्वच्छ डब्यात भरा. आता हे सीरम त्वचेला मॉइश्चरायझिंग करण्यास मदत करेल. सिरमच्या रोजच्या वापराने तुम्हाला तुमच्या त्वचेत सकारात्मक बदल दिसतील.

## सीरमचे फायदे

सीरम चेहऱ्यावर लावल्याने त्वचा हायड्रेट राहते आणि चेहऱ्यावरील तेलकटपणा कमी होतो. याशिवाय यामध्ये असलेले व्हिटॅमिन सी चेहऱ्यावरील उघडे छिद्र कमी करते आणि वृद्धत्वाची लक्षणे कमी करते. सीरम त्वचेवरील डाग कमी करण्यासही मदत करते. सीरमच्या मदतीने तुम्ही तुमची त्वचा उजळ करू शकता. सीरम हे त्वचेच्या आरोग्यासाठी खूप फायदेशीर मानले जाते.

## या गोष्टी लक्षात ठेवा...

जेव्हा तुम्ही घरी सीरम बनवता तेव्हा लक्षात ठेवा की सीरममध्ये वापरलेले सर्व घटक ताजे असावेत. याशिवाय, सीरम हवाबंद आणि स्वच्छ कंटेनरमध्ये ठेवा, सीरम चेहऱ्यावर घासू नका आणि हलक्या हाताने लावा. सीरम लावण्यापूर्वी त्याचा एक पॅच टेस्ट करा. सीरम वापरण्यापूर्वी चेहरा पूर्णपणे स्वच्छ करा, सीरम रात्री वापरणे चांगले होईल. काही लोकांना सीरमची ॲलर्जी असू शकते, जर असे होत असेल तर नक्कीच डॉक्टरांचा सल्ला घ्या.

# दुधाची २ चमचे साय निस्तेज चेहऱ्यावर करेल जादू

**वाढत्या वयाचा, वाढत्या उन्हाचा तुमच्या आरोग्यावर विपरित परिणाम होऊ लागतो. एवढ्या कडाक्याच्या उन्हात प्रत्येकाने स्वतःच आरोग्य नीट ठेवण्यासाठी हेल्थ टिप्स फॉलो केल्या पाहिजेत. सोबतच चेहऱ्याचीही काळजी घेणे गरजेचे आहे. सुंदर दिसणे सर्वांनाच आवडते. यासाठी लोक अनेक प्रयत्नही करतात. तुम्हालाही चमकदार त्वचा मिळवायची असेल तर ही बातमी तुमच्यासाठी आहे. तुम्ही घरच्या घरी दुधाची साय किंवा मलई लावू शकता. कोरड्या त्वचेसाठी दुधाची साय खूप फायदेशीर आहे. चला तर जाणून घेऊया त्वचेवर दुधाची साय कशी लावायची.**

## उपयोग जाणून घ्या...

दुधाची साय त्वचेला हायड्रेट ठेवण्यासाठी देखील खूप मदत करते. यात लॅक्टिक ॲसिड असते. जे पिंपल्स आणि बॅक्टेरिया नष्ट करण्यास मदत करते. चेहऱ्यावर मलई लावण्यापूर्वी तुम्ही तुमचा चेहरा पूर्णपणे धुवा आणि स्वच्छ करा. नंतर हलक्या हातांनी चेहऱ्यावर थोडीशी मलई लावा. यानंतर, हलक्या हाताने मसाज करा आणि २० मिनिटे राहुद्यात. त्यानंतर कोमट पाण्याने चेहरा धुवा. हे आठवड्यातून एक किंवा दोनदा करा. जेणेकरून तुमची त्वचा गोरी आणि चमकदार राहील. याशिवाय तुम्ही याचा वापर फेस मास्क, क्लिन्जर किंवा मॉइश्चरायझर म्हणूनही वापर करू शकता.

## फेस मास्क

फेस मास्कसाठी, तुम्हाला एक चमचा मलई घ्या. नंतर त्यात थोडे मध घाला आणि चेहऱ्यावर लावा. त्यानंतर २० मिनिटे ठेवा आणि कोमट पाण्याने धुवा. क्लींजर बनवण्यासाठी तुम्हाला एक चमचा बेसन आणि एक चमचा मलई मिसळावी लागेल. नंतर हे मिश्रण चेहऱ्यावर लावून हळूहळू मसाज करा आणि नंतर कोमट पाण्याने धुवा. प्रत्येकाची त्वचा वेगळी असते. म्हणूनच क्रीम काही लोकांना सूट करते आणि इतरांना नाही, जर तुम्हाला त्याची ॲलर्जी असेल तर नक्कीच डॉक्टरांचा सल्ला घ्या.



# उन्हाळयात चेहरा कायम चिपचिपा, घामट दिसतो?

**उन्हाचा तडाखा दिवसेंदिवस वाढत चालला आहे. वाढत्या उन्हात त्वचेची काळजी घेणं अत्यंत गरजेचं आहे. उन्हामुळे त्वचेशी संबंधित विविध समस्या निर्माण होतात. खास करून नाजूक त्वचा असलेल्यांसाठी उन्हाळा खूपच त्रासदायक असतो. अनेकांचा चेहरा उन्हाने लाल होतो. अनेकदा सनबर्न किंना ॲलर्जीमुळे देखील हा लालपणा येतो. पण आता तुम्हाला काळजी करण्याची गरज नाही, आज आम्ही तुम्हाला दोन उपायांबद्दल सांगणार आहोत ज्याचा वापर करून तुम्ही तुमचा चेहरा मुलायम आणि चमकदार बनवू शकता. चला त्या गोष्टींबद्दल जाणून घेऊया...**

प्रत्येकाला तरुण आणि सुंदर दिसायचे असते. यासाठी लोक खूप प्रयत्न करतात. मात्र अनेक प्रयत्न करूनही लोकांच्या चेहऱ्यावरील पिंपल्स आणि डाग दूर होत नाहीत. अनेक वेळा हा चिंतेचा विषय बनतो. जर तुम्हालाही चेहऱ्यावरील डागांमुळे त्रास होत असेल तर या दोन गोष्टींचा अवश्य वापर करा. नारळ तेल आणि कोरफड. नारळाच्या तेलात मॉइश्चरायझिंग आणि अँटिऑक्सिडंट गुणधर्म असतात, जे त्वचेला हायड्रेट आणि निरोगी ठेवण्यास मदत करतात. एलोवेरा जेल त्वचेसाठी खूप फायदेशीर मानले जाते. यात दाहक-विरोधी गुणधर्म आहेत, जे त्वचेला थंड ठेवण्यास मदत करतात.

- फेस मास्कचा वापर : तुम्ही खोबरेल तेल आणि कोरफड वेरा जेलने फेस मास्क बनवू शकता, यासाठी तुम्हाला एक चमचा खोबरेल तेल आणि एक चमचा एलोवेरा जेल चांगले मिक्स करावे लागेल, त्यानंतर ही पेस्ट तुमच्या चेहऱ्यावर आणि मानेवर लावा. २० मिनिटांनंतर कोमट पाण्याने धुवा.
- फेसक्रीम : तुम्ही यापासून क्रीमही बनवू शकता. यासाठी एका भांड्यात खोबरेल तेल गरम करून त्यात एलोवेरा जेल टाका आणि मंद आचेवर २० मिनिटे शिजवा, जेव्हा कोरफड काळी पडू लागते तेव्हा गॅस बंद करा आणि थंड होऊ द्या. ते थंड झाल्यावर तुम्ही चेहऱ्यावर लावू शकता. काही लोकांना खोबरेल तेल किंवा कोरफडीची ॲलर्जी असू शकते, त्यामुळे फेस मास्क वापरताना चेहऱ्यावर जळजळ किंवा लाल पुरळ उठत असेल तर नक्कीच डॉक्टरांचा सल्ला घ्या.

# चेहरा धुवून स्वच्छ करताना...

**भारतामध्ये प्रखर उन्हाळा असतो. गेल्या काही वर्षांमध्ये उष्णतेचे प्रमाण वाढत असल्याचे चित्र आपल्यासमोर आहे. मागील एक-दोन आठवड्यांपासून दुपारी उन्हाच्या कडक झळा बसायला सुरुवात झाली आहे. या काळामध्ये शरीरात पाण्याची कमतरता भासायला लागते. परिणामी डिहायड्रेशनसारख्या गोष्टींचा त्रास व्हायला लागतो. उन्हाळ्यामध्ये त्वचेचे देखील नुकसान होते. कोरडी त्वचा, पिंपल्स, सनबर्न अशा समस्या उद्भवतात. अशा वेळी स्कीन केअर रुटीन फॉलो करणे आवश्यक असते.**

त्वचारोग तज्ञ डॉ. गीतिका मित्तल-गुप्ता यांनी चेहऱ्याची निगा राखण्यासाठी दिवसातून दोन वेळा चेहरा धुण्याची सवय लावून घ्यायला हवी, असे सांगितले. रात्री झोपल्यावर चेहऱ्यावर तेल जमा होते. तेव्हा चेहरा साफ करणे आवश्यक असते. दिवसभर घाम, धूळ, प्रदूषण यांच्याचा थर चेहऱ्यावर येऊ शकतो. तेव्हा रात्री झोपण्यापूर्वी चेहरा धुतल्याने तो थर निघून जातो. रात्री चेहरा धुण्याआधी मेकअप देखील काढून टाकावा. या सोप्या सवयींचा समावेश स्कीन केअर रुटीनमध्ये केल्याने खूप फायदा होऊ शकतो, असे तज्ञ सांगतात.

## फॉलो करायच्या टिप्स...



- चेहरा स्वच्छ करताना नेहमी कोमट पाण्याचा वापर करावा.
- बोटांच्या सहाय्याने क्लिंझर हळूवारपणे चेहऱ्याला लावा.
- सकाळी एकदा आणि रात्री एकदा चेहरा धुवायला विसरू नका.
- घाण निघून जाण्यासाठी चेहरा किमान ६० सेकंदांसाठी धुणे आवश्यक असते.
- चेहरा धुतल्यानंतर मऊ टॉवेलने चेहरा हळूहळू पुसावा.
- सौम्य, पीएच लेव्हल संतुलित असलेल्या आणि स्कीन टाइपला योग्य असणाऱ्या क्लिंझरचा वापर करावा.
- नियमितपणे योग्य प्रमाणात टोनर, सीरम, मॉइश्चरायझर, रेटिनॉल आणि सनस्क्रीन वापरा.
- चेहऱ्याची त्वचा ही खूप संवेदनशील आणि नाजूक असते. त्याच्यावर कोणत्याही गोष्टीचा लगेच परिणाम होऊ शकतो. त्यामुळे चेहऱ्याची निगा राखणे आवश्यक असते. उन्हाळ्यामध्ये यावर अधिक लक्ष देणे गरजेचे असते.

# उन्हाळ्यात भरपूर पाणी प्यावं, पण नेमकं किती?



**पाणी म्हणजेच ज्याला आपण जल असे म्हणतो. या पृथ्वीवरील सर्व पशू-पक्ष्यांचे आणि माणसाचे जीवन हे पाण्यावरच अवलंबून आहे. त्यामुळे पाण्याला जीवन असे सुद्धा म्हणतात. आपले शरीर हे ६५ ते ७० टक्के पाण्याने भरलेले आहे. शरीरातील प्रत्येक अवयवाला कार्य करण्यासाठी पाण्याची आवश्यकता असते. आपल्या शरीरातील अवयवांची अंतर्गत कार्यप्रणाली व्यवस्थित चालू राहण्यासाठी पाणी खूप महत्त्वाचे असते. पाण्या अभावी या कार्य प्रणालीत बिघाड होऊ शकतो. त्यामुळे दिवसभरात जास्तीत जास्त पाणी पिणे आवश्यक आहे. मात्र, तुम्हाला माहिती आहे का, तुम्ही दिवसाला किती प्रमाणात पाणी प्यावे, हे तुमच्या वजनावर अवलंबून असते. शरीराच्या वजनानुसार पाण्याची गरज जाणून घेण्याची एक पद्धत आहे आणि हे जाणून घेणं खूप सोपं आहे...**

## कोणी किती पाणी प्यावे ?

भरपूर पाणी प्यावे, असे आपण नेहमी ऐकतो. पण भरपूर म्हणजे नेमकं किती पाणी प्यावे, ते कळत नाही. भरपूर पाणी पिण्याच्या नादात आपण जास्तीचे पाणी पिऊन बसतो. जे आरोग्यास चांगले नसते. तसेच बरेच लोक एकाच वेळी दोन दोन ग्लास पाणी पितात. यामुळे ही शरीराला त्रास होऊ शकतो. त्यामुळे आपले वय आणि वजन किती आहे, याचा विचार करून मग त्या हिशोबाने पाणी पिले पाहिजे. प्रत्येकाच्या वयानुसार पाण्याची गरज वेगवेगळी असते. १५ वर्षे वयापर्यंतच्या मुलांनी साधारणपणे एक ते दोन लिटर पाणी पिले पाहिजे. प्रौढ व्यक्तींनी तीन ते चार लिटर पाणी रोज प्यावे. ज्यांचे वय ६० वर्षे पेक्षा जास्त आहे, अशा व्यक्तींनी तीन लिटरपर्यंत पाणी प्यावे. २५ किलो वजनाच्या व्यक्तीने चार ते पाच ग्लास पाणी पिणे आवश्यक असते. त्याचप्रमाणे ५० किलो वजनाच्या व्यक्तीने दिवसातून आठ ग्लास पाणी पिणे आवश्यक आहे. मेहनतीचे काम करणाऱ्यांनी व गरोदर स्त्रियांनी यापेक्षा थोडे म्हणजे एक दोन ग्लास जास्त पाणी पिल्यास चालते.

## पाणी पिण्याचे सूत्र

प्रथम तुमचे वजन मोजा. एकदा शरीराचं वजन (किलोग्रॅममध्ये) तपासलं गेल्यानंतर त्या संख्येला ३० ने भागायचं. येणारी संख्या ही रोज किती लिटर पाणी प्यायला हवं याची गणना आहे. म्हणजेच, या सूत्रानुसार, आपल्याला समजेल की, शरीराच्या वजनानुसार आपण दररोज किती लिटर पाणी प्यावं. समजा वजन ६० किलो असेल तर ते ३० ने भागाकार केल्यास २ ही संख्या मिळेल. म्हणजेच, ६० किलो वजनाच्या व्यक्तीने दररोज २ लिटर पाणी प्यावं. जर वजन ५० किलो असेल तर १.६ लिटर (१ लिटर आणि ६०० मिली) पाणी प्या. आरोग्य तज्ञांच्या मते, जर तुम्ही योग्य प्रमाणात पाणी प्यायले तर ते वजन कमी करण्यातही मदत करेल. पाण्यात कॅलरीज नसतात. म्हणजेच जितके जास्त पाणी प्याल तितके वजन कमी होईल आणि शरीर हायड्रेटेड राहील.

## पाणी पिण्याची योग्य पद्धत काय आहे ?

पाणी नुसते पिऊन उपयोग नसतो, ते योग्य पद्धतीने प्यायले पाहिजे. पाणी पिताना नेहमी एका जागी बसून प्यावे. उभे राहून, चालताना किंवा गटागट पाणी पिऊ नये. हळूहळू एक एक घोट पाणी प्यावे. तसेच जर तुम्ही खूप तहानलेले असाल तर एकदम पाणी न पिता, एक ग्लास आत्ता व दुसरा ग्लास एक तासाने प्यावे. पाणी काही ठराविक वेळी पिल्यास त्याचे शरीराला चांगले फायदे मिळतात. जसे की सकाळी उठल्यावर लगेच ब्रश न करता एक ते दोन ग्लास पाणी प्यावे. यामुळे शरीर हायड्रेट होते व पित्ताचा त्रास होत नाही. त्यानंतर जेवणाआधी व जेवणानंतर एक ग्लास पाणी प्यावे. डोके दुखत असेल तर पाणी प्या. पाणी किती महत्वाचे आहे ते आपल्या सर्वांना समजले असेलच. त्यामुळे दररोज भरपूर पाणी प्या व निरोगी आयुष्य जगा.

## शॉर्ट न्यूज

### अज्ञात वाहनाच्या धडकेने एकजण ठार

**पाथर्डी :** अज्ञात वाहनाने धडक दिल्याने पाथर्डी तालुक्यातील करंजी येथील बाळासाहेब हिराजी क्षेत्रे (वय ६७) यांचा मृत्यू झाला. यासंदर्भात क्षेत्रे यांच्या कुटुंबातील राजेंद्र शिवाजी क्षेत्रे यांनी दोन दिवसांपूर्वी पाथर्डी पोलिसात फिर्याद दाखल केली आहे. बाळासाहेब क्षेत्रे सार्वजनिक बांधकाम विभागामध्ये सेवेत होते. सेवानिवृत्तीनंतर त्यांचा सामाजिक, धार्मिक कार्यात सहभाग असायचा. करंजी येथील मृत्युंजय वदस्तंभ टेकडीचे अध्यक्ष म्हणून ते गेल्या काही दिवसांपासून काम पाहत होते.

### कोल्हार उपबाजारात गहू २७७० रुपये क्विंटल

**कोल्हार :** राहाता कृषी उत्पन्न बाजार समितीच्या कोल्हार बुद्रुक उपबाजारात गव्हाची १८ क्विंटल आवक झाली. गहू कमीत कमी २४०० रुपये तर जास्तीत जास्त २७७० रुपये प्रति क्विंटल दराने खरेदी करण्यात आला. गहू सरासरी २६०० रुपये प्रति क्विंटल दराने खरेदी करण्यात आला. कोल्हार उपबजारात मक्याची ८ क्विंटल आवक झाली. मका सरासरी २१८६ रुपये प्रति क्विंटल दराने खरेदी करण्यात आला. हरभऱ्याची १ क्विंटल आवक झाली. हरभरा सरासरी ५७९९ रुपये प्रति क्विंटल दराने खरेदी करण्यात आला.

### दाढ बुद्रुकला वादळाचा तडाखा

**राहाता :** तालुक्यातील दाढ बुद्रुक येथे चक्रीवादळ व पाऊस झाल्याने शेतकऱ्यांचे लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे. आठ मोऱ्या रोडकडील भारत तांबे या शेतकऱ्याचे गायीच्या गोठ्याचे व काही ठिकाणी छताचे पत्रे उडून गेले असून त्यात एक गाय दगावली आहे. गावातील अनेक ठिकाणचे विजेचे खांब पडले असून विजेच्या तारा तुटल्या आहेत. त्यामुळे शुक्रवारपासून गावठाण व इतर भागात विज गायब झाली आहे. शेतकऱ्यांची या पावसानं मोठी धांदल उडाली.

### एसी बसविताना विजेचा शॉक बसून तरुण ठार

**शिर्डी :** वातानुकुलीत यंत्र एसी बसविताना विजेचा शॉक लागून २१ वर्षीय अभय पोटे या युवकाचा मृत्यू झाला. या घटनेची तक्रार वडील संजय बाबुराव पोटे यांनी शिर्डी पोलीस ठाण्यात दिली असून पोलिसांनी चौघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. याप्रकरणी शिर्डी पोलीस ठाण्यात महावितरण कंपनीच्या हलगर्जीपणासह तुषार होडे व सूरज होडे (दोघे रा. राम मंदिराजवळ, कोपरगाव) आणि आणखी एक अनोळखी संशयित अशा चौघा विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. घटनास्थळी पोलीस निरीक्षक रामकृष्ण कुंभार यांनी भेट दिली आहे.

### होळकर स्मृती करंडक वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन

**नगर :** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंती त्रिशताब्दी महोत्सवानिमित्त विचार भारतीच्या वतीने राज्यस्तरीय खुल्या वकृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. स्पर्धा सर्व वयोगटासाठी असल्याची माहिती स्पर्धा प्रमुख प्रा. अशोक सागडे यांनी दिली. या स्पर्धेसाठी १) पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर - एक कुशल प्रशासक. २) पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे धार्मिक कार्य. ३) पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे कृषी धोरण. ४) पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सांस्कृतिक राष्ट्रवादाचे प्रतीक असे विषय ठेवण्यात आले आहेत.

# राहाता नगरपालिकेच्या साठवण तलावात ५ टक्के पाणी शिल्लक

## गोदावरी कालव्याद्वारे पाणी सोडण्याची मागणी

**राहाता : प्रतिनिधी**

**राहाता नगरपरिषदेच्या कातनाला पाणी साठवण तलावात फक्त पाच टक्केच पाणीसाठा शिल्लक असल्याने राहतेकरांवर आता भीषण पाणी टंचाईचे संकट घोंगावणार आहे. नगरपरिषद प्रशासनाच्या वतीने सिंचन विभागाला कातनाल्यात गोदावरी उजव्या कालव्यातून पाणी सोडण्यासाठी पाणीपुरवठा विभागाने अर्थात नगरपरिषद प्रशासनाने पत्रव्यवहार केला आहे. मात्र गोदावरी कालव्याला पाणी सुटून दोन-तीन दिवस झाले, तरीसुद्धा नगर परिषदेच्या पाणी साठवण तलावात पाणी न सोडल्याने राहाता शहरवासीयांना भीषण व तीव्र पाणीटंचाईला सामोरे जाण्याची वेळ येणार आहे. सध्या तीन दिवसाआड मिळणारे पाणी भविष्यात वेळेत जर कालव्यातून साठवण तलावात सोडले नाही, तर दहा दिवसांनी पाणी येण्याची शक्यता नाकारता येत नाही.**

राहाता नगरपरिषद हद्दीत सुमारे ३० हजार लोकसंख्या आहे. सार्वजनिक नळ असा सर्व मिळून जर विचार केला, तर दैनंदिन किमान २५ लाख लिटर पाणी राहाता शहराला लागते. तसेच जलकुंभामध्ये अंदाजे २५ लाख लिटर पाणी साठवून ठेवावे लागते. तेव्हा कुठे शहराला पूर्ण दाबाने व वेळेवर तसेच वेळापत्रकानुसार पाणीपुरवठा करता येतो. राहाता नगरपरिषद हद्दीत पंधरा चारी, चौधरी वस्ती, आंबेडकर नगर तसेच पाणीपुरवठा फिल्टर हाऊस या ठिकाणासह एकूण पाच जलकुंभ आहेत. याची सर्वसाधारण क्षमता अंदाजे २० लाख लिटरपर्यंत आहे. राहाता नगरपरिषद हद्दीतील सर्व नळ धारकांना या साठवण तलावातून पाणीपुरवठा होतो. मात्र सध्या फक्त ५ टक्के पाणीसाठा शिल्लक आहे. त्यातही एक-दोन टक्के मृत पाणीसाठा असल्याने तो वापरण्यास अयोग्य आहे. याचा सारासार विचार केला, तर साठवण तलावात असलेल्या पाण्यापैकी दोन टक्केच पाणी वापरा योग्य आहे.

जर येत्या दोन दिवसांत पाणी आले नाही, तर शहरवासीयांना १० दिवसांत पाणी देण्याची नामुष्की नगरपरिषद प्रशासनावर व पाणीपुरवठा विभागावर येईल. हे भीषण पाणीटंचाईचे उद्भवणारे संकट टाळण्याकरिता नगरपरिषद प्रशासन सिंचन विभागाला वारंवार व समक्ष भेटून विनंती करत असल्याचे समजते. सिंचन विभागाने तातडीने गोदावरी उजव्या कालव्यातून राहाता नगरपरिषदेच्या पाणी साठवण तलावात पाणी सोडून



राहतेकरांवर उद्भवणारे संकट दूर करावे, अन्यथा नगरपरिषद प्रशासना बरोबरच सिंचन विभागालाही नागरिकांच्या रोषाला सामोरे जाण्याची शक्यता आहे. सध्या उकाड्याने नागरिक हैराण होत असून उन्हाची तीव्रता वाढली आहे. त्यात मागील वर्षी पुरेसा पाऊस न झाल्याने भूजल पातळी खालवली आहे. त्यामुळे टंचाईत भर पडली आहे.

नगरपरिषद हद्दीतील अनेक खासगी कुपनलिका तसेच विहिरी यांची सुद्धा पाणी पातळी खोल गेली असून काही ठिकाणी, तर कुपनलिका आटल्याने व विहिरी कोरड्या झाल्या. नागरिकांना स्वतःच्या कुपनलिका व विहीर असतानाही पाणी विकत घेण्याची वेळ आली आहे. अशा परिस्थितीत ही पाण्याची उद्भवणारी गंभीर समस्या सुटणे गरजेचे आहे, अन्यथा मोठ्या संकटाला सामोरे जावे लागेल.

# अल्पवयीन मुलीला भर रस्त्यात छेडले

## अरणगावमधील रोडरोमिओंवर गुन्हा दाखल

**अरणगाव : प्रतिनिधी**

**येथील मेहेरबाबांच्या समाधीचे दर्शन घेऊन घरी जात असलेल्या अल्पवयीन मुलीला रस्त्यात अडवून तिची छेडछाड काढण्यात आली. तसेच पीडितेबरोबर असलेले तिचे वडील व दोन्ही भावांना रोडरोमिओंनी मारहाण केल्याचा प्रकार समोर आला आहे. या संदर्भात पीडितेने नगर तालुका पोलीस ठाण्यात दाखल केलेल्या फिर्यादीवरून पोलिसांनी सुमारे आठ जणांविरोधात बाललैंगिक अत्याचार, विनयभंग, जीवघेणा हल्ला आदी गुन्हे दाखल केले आहेत.**

पीडित मुलगी शुक्रवारी सायंकाळी मेहेरबाबा समाधीचे दर्शन घेऊन कुटुंबियांसह घरी निघाली होती. त्यावेळी सात ते आठ जणांच्या जमावाने मुलीला अडवून तिची छेड काढली. पीडितेला एकाने हात धरून ओढत लज्जा उत्पन्न करणारे वर्तन केले. या प्रकाराला



पीडितेचे वडील व दोन भावांनी विरोध केला असता जमावाने पीडितेच्या वडिलांना जीवे मारण्याची धमकी दिली. दोन्ही भावांना मारहाण केली.

या सर्व प्रकाराचे पीडितेच्या भावांनी व्हिडिओ चित्रीकरण केले असता जमावाने त्यांचा मोबाईल फोडल्याचेही फिर्यादीत म्हटले आहे. या फिर्यादीवरून आरोपींविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# विजेचा धक्का लागून शेतकऱ्याचा मृत्यू

## खांबात विद्युत प्रवाह उतरला

**श्रीगोंदा : प्रतिनिधी**

**शेतात विहिरीवरील मोटार चालू करण्यासाठी गेलेल्या शेतकरी तरुणाचा विजेचा शॉक लागून मृत्यू झाल्याची घटना श्रीगोंदा तालुक्यातील काष्टी-लिंपणगाव परिसरात घडली. अमोल दत्तात्रय दळवी (वय ३८) असे मयत तरुणाचे नाव आहे.**

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार रविवारी सकाळी साडेदहा वाजण्याच्या सुमारास काष्टी येथील अमोल दत्तात्रय



दळवी हा तरुण काष्टी- लिंपणगाव परिसरातील शेतातील विहिरीवर असलेली पाण्याची मोटार चालू करण्यासाठी गेला होता. त्यावेळी विजेच्या खांबात विद्युत प्रवाह उतरल्याने अमोल यास विजेचा जोरदार धक्का लागल्याने त्याचा जागीच मृत्यू झाला. त्यांच्या पश्चात आई, वडील, पत्नी, दोन लहान मुले असून या प्रकरणी श्रीगोंदा पोलीस ठाण्यात अभिजित दळवी यांच्या खबरीवरून अकस्मात मृत्युची नोंद करण्यात आली आहे.

(पान १ वरून) **नाशकात निवडणूकीत गाजला कांद्याचा प्रश्न**

सुरुवात झाली आहे. नाशिक लोकसभा मतदारसंघात हेमंत तुकाराम गोडसे (शिवसेना), राजाभाऊ वाजे (उद्धव गटातील शिवसेना) आणि अपक्ष उमेदवार शांतीगिरी महाराज यांच्यात लढत होणार आहे. तर दिंडोरी मतदारसंघात डॉ. भारती प्रवीण पवार यांच्या विरोधात भास्कर मुरलीधर भगरे (शरद गट) हे निवडणुकीच्या रिंगणात आहेत.

### महागड्या मोबाईलच्या हट्टापायी संपविले जीवन

धरला होता. तो घेण्यासाठी त्याला पैसे हवे होते. मात्र, असा मोबाईल आताच नको, असे सांगत वडिलांनी पैसे देणे टाळले. याचा राग धरून गजानन याने २८ एप्रिल रोजी विषारी औषध सेवन करून आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. गंभीर अवस्थेत त्याला रुग्णालयात दाखल करण्यात आले. दरम्यान गजाननवर उपचार सुरू होते. अलीकडेच त्याची प्रकृती देखील सुधारली होती. दोन दिवसांनी घरी सोडता येईल, असेही डॉक्टरांनी सांगितले होते. मात्र १८ मे रोजी त्याची प्रकृती पुन्हा बिघडली आणि सायंकाळी सहा वाजता त्यातच त्याचा मृत्यू झाला. या घटनेची माहिती पोलिसांना देण्यात आली असून पोलिसांनी या घटनेची नोंद घेतली आहे. मोबाईलच्या हट्टापाई एका युवकाने जीव गमावल्याने परिसरात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

### प्रतीक्षा संपली : बारावीचा निकाल मंगळवारी!

माध्यमिक शिक्षण मंडळाच्या डेटानुसार, यावर्षी राज्यात एकूण १५,१३,९०९ उमेदवारांनी बारावीच्या परीक्षेसाठी नोंदणी केली होती. त्यात ८,२१,४५० मुले आणि ६,९२,४२४ मुलींचा समावेश आहे. ७,६०,०४६ विज्ञान शाखेत बारावीच्या परीक्षेसाठी सर्वाधिक उमेदवारांची नोंदणी झाली होती, त्यापाठोपाठ कला शाखेतील ३,८१,९८२ विद्यार्थी आणि वाणिज्य शाखेतील ३,२९,९०५ उमेदवार आहेत. गेल्या वर्षी महाराष्ट्र बारावीच्या परीक्षेत, कोकण जिल्ह्यात सर्वाधिक उत्तीर्ण होण्याचे प्रमाण ९६.०१ टक्के होते.









# मळगंगा ट्रस्टच्या सभेत हमरातुमरी, धावाधावी!

## विश्वस्त मंडळाची निवड गुप्त मतदान पध्दतीने करण्याचा निर्णय

निघोज : प्रतिनिधी

**निघोज येथील मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टच्या विश्वस्तांच्या निवडीसाठी बोलविण्यात आलेल्या बैठकीत ग्रामस्थांमध्ये हमरातुमरी होऊन एकमेकांवर धावून जाण्यापर्यंत मजल केली. अखेर विश्वस्तांची निवड बिनविरोध न करता गुप्त मतदान पध्दतीने करण्याचा निर्णय या वादळी बैठकीत घेण्यात आला.**

मळगंगा ट्रस्टच्या विश्वस्तांची निवड करण्यासाठी रविवार दि.१९ मे रोजी विशेष वार्षिक सर्वसाधारण सभेचे आयोजन करण्यात आले होते. या सभेस सुरूवात झाल्यानंतर विद्यमान पदाधिकारी तसेच ग्रामस्थांमध्ये वाद सुरू होउन गोंधळ सुरू झाला. विश्वस्त मंडळाने गावकऱ्यांना अंधारात ठेऊन ट्रस्टमध्ये राजकारण करण्यासाठी सभासद वाढविल्याचा आरोप यावेळी करण्यात आला. विश्वस्त मंडळामध्ये बगलबच्चांची वर्णी लावण्यासाठी गावकऱ्यांना अंधारात ठेऊन सभासद वाढ करण्यात आल्याचा आरोप यावेळी करण्यात आला.

निवडणूक बिनविरोध करण्यासाठी सचिव शांताराम कळसकर यांनी खोटरडेपणा केला असून त्यांनी मळगंगा देवीपुढील भंडार उचलून सभासद वाढ ही राजकारणासाठी केली नाही असे सांगितल्यास तुम्ही म्हणाल ते विश्वस्त मंडळ निवडावे अशी मागणी यावेळी सचिन वराळ, ज्ञानेश्वर वरखडे, सुनील पवार, दिलीप ढवण, शिवाजी लंके, अनंतराव वरखडे, देवराम वराळ, मंगेश लाळगे यांच्यासह सभासदांनी केली. या मागणीवर सर्व विश्वस्त मंडळास विश्वासात घेऊन करण्यात आल्याचा खुलासा सचिव शांताराम कळसकर व सहसचिव रामदास वरखडे यांनी यांनी केला. त्यानंतर सुनील वराळ, वसंत कवाद, दत्तात्रेय लंके, ठकराम लंके, मंगेश वराळ, रूपेश ढवण इतर सभासदांनी विश्वस्त मंडळाचा सभासद वाढीचा निर्णय योग्य असल्याची भूमिका मांडली. त्यानंतर गोंधळात वाढ होऊन हमरातुमरी होऊन एकमेकांवर धावून जाण्यापर्यंत मजल गेली. वातावरण हाणामारीपर्यंत जाऊ लागल्याने ज्येष्ठ मंडळींना मध्यस्ती करत वाद शमविण्याचा प्रयत्न केला.

यावेळी बोलताना बबुशा वरखडे यांनी मळगंगा ट्रस्टचा राज्यात नावलौकीक असून तो वाढविण्यासाठी गट-तट किंवा राजकारण न करता योग्य व्यक्तींना पदावर संधी देण्यात यावी अशी सुचना केली. सुनील वराळ यांनी त्यास हरकत घेत राजकारणाशी ट्रस्टचा काहीही संबंध नसल्याचे ठणकावून सांगितले.

ट्रस्टचे अध्यक्ष प्रभाकर कवाद यांनी विविध विकास कामांमध्ये मळगंगा पतसंस्थेचे मोठे योगदान असल्याचे सांगितले. ट्रस्टच्या पतसंस्थेकडे असलेल्या ११ लाख रूपयांच्या ठेवी जुलै महिन्यात परत करण्यात येतील. पदाधिकारी निवड बिनविरोध करण्याची मागणी कवाद यांनी केली.



मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टच्या सभेस निघोजकरांनी मोठया संख्येने हजेरी लावली होती.

### दुरगामी परिणाम भोगावे लागतील

**देवीच्या ट्रस्टमध्ये राजकारण करणारांचे काय झाले हे सर्वांनी पाहिलेले आहे. देवस्थानमध्ये राजकारण करणारांना तात्पुरते समाधान लाभेल पण त्याचे दुरगामी परिणाम भोगावे लागतात हा आजवरचा अनुभव आहे.**

बबुशा वरखडे
दिलीप ढवण

### नवे सभासद गुप्त मतदानासाठी आग्रही

**मागिल वर्षी नव्याने सभासद करण्यात आले आहेत. याच सभासदांची सभेस मोठी उपस्थिती होती. या सभासदांनी बिनविरोध निवड न करता गुप्त पध्दतीने निवड करण्याचा आग्रह धरला. त्यानंतर सर्वानुमते गुप्त मतदान पध्दतीने विश्वस्तांची निवड करण्याचा निर्णय या सभेत घेण्यात आला.**

### अल्पवयीन सभासद ?

**वर्षभरात तीनशे नवे सभासद घेण्यात आले असून त्यामध्ये अल्पवयीन सभासदांचाही समावेश आहे. अशा पध्दतीने विश्वस्त मंडळाने चुकीचा पायंडा पाडला असून अल्पवयीन सभासदांमुळे फौजदारी गुन्हा दाखल होऊ शकतो.**

शिवाजी लंके
यात्रोत्सव समिती अध्यक्ष

### खुर्चीच्या भांडणाऐवजी विकासाकडे लक्ष द्या

जगप्रसिध्द रांजणखळगे हा राज्याचा अनमोल ठेवा आहे. यात्रोत्सव संपल्यानंतर ट्रस्टच्या वतीने रांजणखळगे परिसरात स्वच्छता मोहिम हाती घेणे अपेक्षित असताना त्याकडे दुर्लक्ष करण्यात आले. अस्वच्छतेबाबत भेटी देणाऱ्या पर्यटकांकडून नाराजी व्यक्त करण्यात आली. ट्रस्टच्या खुर्चीसाठी भांडण्यापेक्षा विकास कामांकडे लक्ष देणे गरजेचे आहे.

विजय संपत वराळ

### आवाजी मतदान आणि कवाद अध्यक्ष

मळगंगा पतसंस्था व मळगंगा ट्रस्टचे प्रभाकर कवाद हे अध्यक्ष आहेत. ट्रस्टच्या ठेवी पतसंस्थेकडे असून त्या परत करण्यात आल्या नसल्याने विशेष सर्वसाधारण सभेच्या अध्यक्षपदी राहण्याचा त्यांना अधिकार नाही अशी भूमिका बाळू किसन कवाद यांनी मांडली. त्यावर आवाजी मतदानाने प्रभाकर कवाद हेच सभेच्या अध्यक्षस्थानी राहतील असा ठराव करण्यात आला. त्यानंतर बाळू कवाद यांनी सभेवर बहिष्कार टाकत ते निघून गेले.

### अनुकंपा पध्दत बंद करा !

विश्वस्त निवडताना अनुकंपा भरतीप्रमाणे निवड न करता कामाच्या व्यक्तींना संधी देण्यात यावी. गेल्या दहा वर्षांच्या पदाधिकाऱ्यांची यादी पाहिली असताना बाप पदाधिकारी आणि मुलगा विश्वस्त असल्याचे दिसून येते. प्रस्तापितांना संधी देऊन काम करणाऱ्या युवकांना थांबविणे बरे नाही. चमकोगीरी करणाऱ्या विश्वस्तांची पध्दत न ठेवता जो योगदान देतो त्यास संधी मिळाली पाहिजे.

रूपेश ढवण
युवा कार्यकर्ते

### आम्हाला विश्वासात घेतले नाही

ट्रस्टची सभासद वाढ ट्रस्टचे अध्यक्ष प्रभाकर कवाद व आम्हाला विश्वासात न घेता करण्यात आली आहे. पदाधिकाऱ्यांनी निवड बिनविरोध करण्यात यावी. विश्वासात न घेता वाढविण्यात आलेल्या सभासदांचे सभासदत्व रद्द करण्यात यावे.

ज्ञानदेव लंके
कोषाध्यक्ष

### कर्जदाराच्या पुनर्वसनासाठी धडपड

मळगंगा ट्रस्टला मळगंगा पतसंस्थेकडून ११ लाख रूपये घेणे आहे.संस्थेच्या एका थकीत कर्जदाराने आम्हाला अडचणीत आणले आहे. संबंधित कर्जदाराने कर्जाची रक्कम जमा करून संस्थेला सहकार्य करावे. संस्थेने रक्कम जमा झाल्यानंतर ट्रस्टकडे जमा करावेत. थकबाकीदार कर्जदाराचे राजकीय पुनर्वसान करण्यासाठी ट्रस्टचे काही पदाधिकारी आघाडीवर आहेत. ट्रस्टच्या निवडीकडे ग्रामपंचायत, सेवा संस्था, जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणूकीप्रमाणे न पाहता धार्मीक काम करणारांना तिथे संधी देण्यात यावी. ट्रस्टमध्ये राजकारण केल्यास त्याचे परिणाम भोगावे लागतात.

भास्कर कवाद
पत्रकार

---

## मुळा धरणाचा पाणीसाठा संकटात

### धरणात अवघे २५.७९ टक्के पाणी

राहुरी : प्रतिनिधी



**गेल्या वर्षी पावसाने दडी मारल्याने जिल्ह्यात दुष्काळसदृश्य परिस्थिती आहे. दक्षिण नगर जिल्ह्याला पाणीपुरवठा करणारा मुळा धरणाचा पाणीसाठा संकटात सापडला आहे. धरणात अवघे २५. ७९ टक्के पाणीसाठा शिल्लक आहे. त्यामुळे शेतीसाठी आवर्तन नसल्याने शेतकरी चिंतेत आहे.**

पाण्याअभावी पिके जळत असताना पिण्याच्या पाण्याचा प्रश्नही गंभीर बनला आहे. सिंचनासाठी पाणी मिळावे, म्हणून शेतकऱ्यांकडून रस्त्यावर उतरून आंदोलन करण्यात येत आहे. मुळा धरणावर पाच वर्षानंतर प्रथमच दुष्काळाचे सावट आहे. गेल्या वर्षी ९४९८ दशलक्ष घनफूट पाणीसाठा शिल्लक राहिला होता. परंतु, यंदा समन्यायी कायद्यामुळे जायकवाडी धरणात दोन हजार दशलक्ष घनफूट पाणी सोडल्याने धरण क्षेत्रावर आणीबाणीची वेळ आली आहे.

## नगरमध्ये पोलीस उबाठा शिवसेनेला टार्गेट करत आहे

### माजी महापौर भगवान फुलसौंदर यांचा आरोप

नगर : प्रतिनिधी



**नगरमध्ये शिवसेना नेते खा. संजय राऊत व युवा सेनेचे राज्य सचिव विक्रम राठोड यांच्यावर पोलिसांनी गुन्हे दाखल केले आहे हे शिवसैनिकांना पटले नाही नगरमध्ये पोलीस फक्त उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेला टार्गेट करत असल्याचा आरोप माजी महापौर भगवान फुलसौंदर यांनी केला.**

याबद्दल दाखल केलेल्या गुन्ह्याप्रकरणी फुलसौंदर म्हणाले लोकसभेची नगरची निवडणूक पार पडली यामध्ये सभेचा धुराळा उडाला होता,आमचे शिवसेना नेते खा. संजय राऊत हे नगरला आले ,महायुतीचे उमेदवार नीलेश लंके यांच्या प्रचारार्थ नगरला आले होते इतर नेते होते, शिवसेनेचा टायगर असलेले राऊत यांनी भाषण केले, लोकशाहीमध्ये भाषण स्वतंत्र आहे परंतु त्यांच्यावर कोतवाली मध्ये गुन्हे दाखल करण्यात आले आहे ,हे लोकशाहीला धरून नाही कारण घटना घडल्यानंतर व निवडणूक संपल्यानंतर हे गुन्हे दाखल करण्यात आलेआहेत .

विरोधी पक्षांवर बोलणे हे प्रत्येक कार्यकर्त्याचे कर्तव्य असते त्यांनी लोकांसमोर लोकसभेच्या भानगडी आणल्या म्हणून गुन्हा दाखल झाला,परंतु ज्या लोकांना जेलमध्ये टाकायचे तेच आज मंत्रीपद भोगत आहेत.पण नगरमध्ये मात्र चुकीच्या पद्धतीने गुन्हे दाखल होत आहेत. पोलिसांनी नगर शहरातील चोऱ्या, गुंडागर्दी ,भर दिवसा हाणामाऱ्या यावर कारवाईची करायचे सोडून जखम मांडीला व इलाज शेंडीला या म्हणीप्रमाणे पोलिसांचे काम सध्या नगर शहरामध्ये चालू आहे

दुसरे प्रकरण असे की मतदानाच्या दिवशी शिवसेनेचे युवा सेनेचे विक्रम राठोड यांनी शाई लावणारा मनुष्य पकडला व पोलिसांच्या ताब्यात दिला, तर त्याच्यावरच खोटा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या नगर शहरात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरेंची लोकप्रियता आहे, काही विरोधी पक्षाच्या लोकांना ती सहन होत नाही,म्हणून शिवसेनेला टारगेट केले जात आहेत असा आरोप त्यांनी केला व असे उद्योग आम्ही शिवसैनिक खपवून घेणार नाही व गुन्हे मागे घ्यावेत असे आवाहन त्यांनी शिवसैनिकांच्या वतीने केले आहे.

## जीवघेणा हल्ला करणारे सात आरोपी गजाआड

### एलसीबीच्या पथकाची कारवाई

नगर : प्रतिनिधी

**राजकीय पूर्ववैमनस्यातून बोल्हेगाव येथे दोन गटांत कोयत्याने जीवघेणा हल्ला झाला. या संदर्भात तोफखाना पोलीस ठाण्यात परस्पर विरोधी फिर्यादी दाखल झाल्या होत्या. या प्रकरणात स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकांनी काल (रविवारी) सात आरोपी व एक विधीसंघर्षीत बालकाला ताब्यात घेतले.**

जिल्हा पोलीस अधीक्षक राकेश ओला यांनी या प्रकरणाचा तपास स्थानिक गुन्हे शाखेकडे सोपविला होता. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक दिनेश आहेर यांनी दोन पथके नियुक्त केली. या पथकांनी रुग्णालयात जाऊन दोन्ही फिर्यादींकडून घडलेला प्रकार जाणून घेतला.

या प्रकरणातील आरोपी त्यांचे फोन बंद करून पसार झाले होते. पथकाने तपास



करत शहरातील विविध ठिकाणांवरून आरोपींना ताब्यात घेतले. यात अभिषेक राजेंद्र लांडगे (वय २२), संकेत किसनराव भिंगारदिवे (वय २२), जमीर शौकत पठाण (वय २०), ओमकार सतीश आपरे (वय २१, सर्व रा. गांधीनगर, नगर), परमेश्वर हरिभाऊ मगर (वय २१, रा. बोल्हेगाव, नगर), थॉमस संतोष सरोदे (वय २३), यश रावसाहेब शिरसाठ (वय १९, रा. गांधीनगर, मोरया पार्क, नगर) तसेच एक विधीसंघर्षीत बालकाला पथकाने ताब्यात घेतले. त्यांना पुढील तपासासाठी तोफखाना पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

---

## पारनेर, श्रीगोंद्यात कांदा खरेदी केंद्र सुरू होणार

### आय एस नेगी, सुभाषचंद्र मिना यांची ग्वाही



चोंभूत / सुपा : प्रतिनिधी

**नाफेड आणि एनसीसीएफ कांदा खरेदीमध्ये पारनेर आणि श्रीगोंदे तालुक्याला प्राधान्य देण्याच्या प्रसाद खामकर यांच्या मागणीस ग्राहक व्यवहार विभागाचे अतिरिक्त सचिव आय. एस. नेगी तसेच संचालक सुभाषचंद्र मीना यांनी सकारात्मक प्रतिसाद देत पुढील महिन्यात दोन्ही तालुक्यांत कांदा खरेदी केंद्र सुरू करण्याची ग्वाही दिली.**

शासनाच्या या निर्णयाचे शेतकरी वर्गाकडून स्वागत करण्यात आले आहे. ग्राहक व्यवहार विभाग या वर्षी पाच लाख टन कांदा खरेदी करणार असून त्यासंदर्भात शनिवारी नाशिक येथे बैठक पार पडली. कांदा खरेदीसाठी नाफेड आणि एनसीसीएफ या सरकारी संस्थांची नियुक्ती करण्यात आली आहे.

नाशिक येथील बैठकीनंतर नगरमार्गे पुण्याकडे जाताना पारनेर तालुक्यातील शेतकरी प्रसाद खामकर आणि श्रीगोंदे येथील रियल ॲग्रो फार्मर्स कंपनीचे संचालक संभाजी घुटे यांनी आय.एस.नेगी आणि सुभाषचंद्र मीना यांची भेट घेतली. नगर जिल्हयातील पारनेर, नगर आणि श्रीगोंदे तालुक्यात चांगल्या प्रतीच्या कांद्याचे उत्पादन घेतले जाते. त्यामुळे नाफेड आणि एनसीसीएफच्या माध्यमातून होणाऱ्या कांदा खरेदीमध्ये पारनेर, नगर, श्रीगोंदे तालुक्याला प्राधान्य देण्यात यावे. पारनेर व श्रीगोंदा येथे कांदा खरेदी केंद्र सुरू करण्यात येऊन कांदा उत्पादक शेतकऱ्यांना न्याय द्यावा अशा आशयाचे निवेदन उभायतांना देण्यात आले. आय.एन. नेगी आणि सुभाषचंद्र मीना यांनी प्रसाद खामकर यांच्या मागणीस अनुकूल प्रतिसाद देत पारनेर आणि श्रीगोंदे येथे पुढील महिन्यात नाफेड आणि एनसीसीएफचे कांदा खरेदी केंद्र सुरू करण्याची ग्वाही दिली.


## अवतार मेहेरबाबांचा अरणगावच्या प्रेमाश्रमला १०० वर्ष पूर्ण

### पाण्याच्या टाकीतच बांधली होती वैशिष्टयपूर्ण इमारत

अरणगाव : प्रतिनिधी

**येथील दुर्लक्षित ब्रिटिशकालीन सैन्य वसाहतीमध्ये मेहेरबाबांनी ४ मे १९२३ रोजी, बरोबर १०० वर्षांपूर्वी प्रवेश केला होता, दौंड-रोडवर अरणगाव येथे वसलेली एक छोटी वसाहत,रस्त्याच्या दोन्ही बाजूला पसरलेली वसाहत.एका बाजूला लहानशी टेकडी आहे.पहिल्या महायुद्धाच्या वेळी या टेकडीवर ब्रिटिशांनी एक पाण्याची टाकी बांधली होती.त्या टाकीमध्येच मेहेरबाबांनी राहण्याची जागा आणि सभागृह तयार करवून घेतले होते.त्या टाकीमध्ये बांधलेल्या वैशिष्ट्यपूर्ण इमारतीवर आज एक सतरंगा ध्वज फडकताना दिसतो. त्या टेकडीवर मेहेरबाबांची समाधी उभी आहे.अशा या अरणगाव(मेहेराबाद)येथील अवतार मेहेरबाबांचा प्रेमाश्रमला १०० वर्ष पूर्ण झाले आहेत.**

''सेवेतील स्वामित्व हे अर्थवाही शब्द समाधीच्या दर्शनी भागावर कोरले आहेत.समाधीच्या चार कोपऱ्यांवर चार मोठ्या धर्मांची प्रतीके दिसतात मंदिर,मशीद,आग्यारी आणि ख्रिस्ती क्रॉस.आत गेल्यावर माणसाचे मन निःशब्द होते, करुणा आणि प्रसन्नता यांचा मनात उगम होतो आणि भाविक मेहेरबाबांना शरण जातो.''मी शिकवण्याकरिता नव्हे तर जागृत करण्याकरिता आलो आहे''हे समाधीवरचे वाक्य मेहेरबाबांच्या कार्याची दिशा स्पष्ट करते.या ओसाड, दुर्लक्षित ब्रिटिशकालीन सैन्य वसाहतीमध्ये मेहेरबाबांनी



१९२३ च्या ४ मे रोजी म्हणजे बरोबर १०० वर्षांपूर्वी प्रवेश केला आणि या क्षेत्राचा कायापालट झाला. हाकेच्या अंतरावर असलेल्या अरणगावामध्ये बहुतांशी गोरगरीब, मागासलेल्या कष्टकऱ्यांची आणि शेतकऱ्यांची वस्ती होती. त्यांच्या शुश्रूषेसाठी आणि शिक्षणासाठी मेहेरबाबांनी पहिली काही वर्षे खर्च केली. अंत्योदयाची मुहूर्तमेढ रचली.

शाळा आणि दवाखाना सर्वांसाठी विनामूल्य सेवा देत. तेथे जाती-धर्माचा भेद नव्हता.स्वतःच्या देखरेखीत या शाळेतील मुलांना शिक्षण दिले आणि त्याचबरोबर सर्व धर्मांचे अंतिम ध्येय एकच आहे हे बिंबवले.त्यांनी स्वतः लिहिलेलीहरी, परमात्मा, अल्ला, अहुर्मझद, गॉड, यझदान, हू''ही प्रार्थना तेथील मुले रोज तालासुरात म्हणत असत. शाळेला त्यांनी आपल्या गुरूचे नाव दिलेहजरत बाबाजान संकुलआणि त्यातल्या आध्यात्मिक शिकवणीच्या वर्गाला नाव दिले प्रेमाश्रम.

१९२५-२६ मध्ये मेहेराबाद येथे मेहेरबाबांनी रस्त्यालगतच एक टेबलवजा पिंजरा करून घेतला आणि त्यात बसून आध्यात्मिक गाथेची निर्मिती केली, ज्यात अनेक आध्यात्मिक रहस्यांचा उलगडा त्यांनी केला. हे हस्तलिखित आज गुप्त असले तरी याच विषयावरील त्यांचा गॉड स्पीक्स हा ग्रंथ आज देशी-विदेशी अनेक भाषा मध्ये प्रसिद्ध आहे १९२५ साली १० जुलैला येथूनच मेहेरबाबांनी आपल्या महामौनाला सुरुवात केली. जे मौन त्यांनी आपल्या कार्यकाळाच्या अखेरपर्यंत अबाधित ठेवले. आज मानवाला शब्दांच्या माध्यमातून दिलेल्या उपदेशाची जरूर नसून मानवाचे हृदयापासून परिवर्तन जरुरी आहे, आणि हे आमूलाग्र परिवर्तनच मानवाला फसव्या मायाजालातून जागृत करू शकेल आणि व्यक्ती- व्यक्तीतील द्वेष, दुरावा दूर होऊन त्यांच्यात परस्पर प्रेमाचा संचार करेल, हा त्यांचा मौन संदेश होता.

जगभर कोठेही गेले तरी मेहेरबाबा मेहेरबादलाच परत येत असत आणि १९४४ पर्यंत हेच त्यांचे प्रमुख वास्तव्य होते.३१ जानेवारी १९६९ ला मेहेरबाबांनी देहत्याग केला.त्यांचा देह त्यांच्या समाधीत सुपूर्द केला गेला. .मेहेरबाबांच्या समाधीचे दर्शन आणि तिथे अजूनही जाणवणारा मेहेरबाबांचा अमृतमय सहवास ही एक विलक्षण अनुभूती आहे.

'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com
'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)
Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com